Modern Education Society's

# NESS WADIA COLLEGE OF COMMERCE

19, Prin. V. K. Joag Path, Pune - 411 001. Maharashtra State (India)
Website : www.nwcc.mespune.org
Senior College ID/No. : PU/PN/C/021/1969
Senior College Code No. : 060 Junior College Code No. : J.I 1.15.003
Re-accredited by NAAC (2023-2028)
Affiliated to the University of Pune and Recognised by Government of Maharashtra
Recognised Under Section 2(f) and 12(B) of UGC Act, 1956



College (O) : 020-26167024 / 26160909 Fax : 020-26163149 / 26160572 E-mail : nesswadiacollege@gmail.com

**अत्यंत महत्वाचे** **२९.०९.२०२५**

## सूचना

## दिव्यांगजन विद्यार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना २०२५ – २६
## (BBA,BBA(CA),BBA(IB)

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय. नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सन २०२५-२६ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने एन.एस.पी पोर्टल वरून मागविण्यात येत आहेत ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडुन गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते विद्यार्थ्यांना मंजुर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**किमान पात्रता व अटी ः**

१.अपंगत्व टक्केवारी ४० टक्के किंवा त्यापुढील असावी.
२.मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
३.अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड चा लाभार्थी नसावा.
४.अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रू २.५० लाख पर्यंत असावे.
५.एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. (जर दुसरे व तिसरे आपत्य जुळे असतील तर सदर योजनेचा लाभ घेता येईल )

दिव्यांगजन विद्यार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजुरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२५ ही आहे.**

सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्ज भरून सर्व कागदपत्रासह मुदतीत शिष्यवृत्ती काउंटर नं ३ वर जमा करावा

**अधिक माहितीसाठी दिव्यांगजन विद्यार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना २०२५ – २६ महाराष्ट्र शासन ची जाहिरात पहावी.**

प्राचार्या

Ness Wadia College of Commerce Pune 1.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**17, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे 411 001**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – jdhepune.in

फोन नं 020-26127833 / 26051632 फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र. – ससं/उशि/पुवि/दिव्यांगजन पोस्ट मॅट्रिक/2025-26/ दिनांक : 15.07.2025

**परिपत्रक**

प्रति,

1. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
   कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
   पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
   तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
2. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
3. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
4. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
5. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
6. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
7. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
8. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय – केंद्रशासनाच्या दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन 2025-26 च्या अंमलबजावणीबाबत . .**

संदर्भ : - 1. केंद्र शासनाचे पत्र क्र. Z – 11017/18/2022-SCH दि. 04.07.2025.
2. मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं – शिष्य / दिव्यांगजन / 2025-26 / E – 1993608 दि . 14.07.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, भारत सरकार दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने दिव्यांगजन पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सन 2025-26 मध्ये नविन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन पध्दतीने एनएसपी पोर्टलवरुन मागविण्यात येत आहेत. सदर शिष्यवृत्ती (XI, XII,

Post- Matriculation Diploma / Certificates, Bachelor's Degree or Diploma in India, Master's Degree / Diploma from any University recognized by UGC / AICTE या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थी या योजनेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीनेच एनएसपी पोर्टलवरुन करु शकतात.

सदर शिष्यवृत्तीबाबत किमान पात्रता अटी, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती आणि विद्यापीठ, महाविद्यालय, संस्थेसाठी सूचना याबाबत सविस्तरपणे मा. संचालनालयाचे दि . 14.07.2025 रोजीच्या परिपत्रकामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आले आहे.

दिव्यांगजन पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती 2025-26 योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव / प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP ( Standard Operating Procedure) मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तरी सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठे यांनी सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती या कार्यालयास देण्यात यावी.

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 17-07-2025 17:32:16

**(डॉ. अशोक उबाळे )**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे 16 यांना माहितीस्तव सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**४१२, ई- बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१६**

**web: www.dhepune.gov.in** **E-mail: schol.dhepune@gov.in**

फोन नं.०२०/२९७०७०९८

क्र.उशिसं-/शिष्य/दिव्यांगजन/२०२५-२६/ E-१९९३६०८ दिनांक /०७/२०२५

**परिपत्रक**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय : केंद्रशासनाच्या दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२५-२६ च्या अंमलबजावणीबाबत .**

**संदर्भ** : केंद्रशासनाचे पत्र क्रमांक- File No. Z-११०१७/१८/२०२२-SCH, दि.०४.०७.२०२५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, भारतसरकार दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्यक करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सन २०२५-२६ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे (Fresh) आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन पध्दतीने एनएसपी पोर्टल वरुन मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode ) जमा करण्यात येते.

सदर शिष्यवृत्ती XI,XII, Post-Matriculation Diploma/Certificates, Bachelor's Degree or Diploma in India, Master's Degree/Diploma from any University recognized by UGC/AICTE या अभ्याक्रमासाठीचे विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

**किमान पात्रता व अटी** :

१. दिव्यांगत्व टक्केवारी ४० टक्के किंवा त्यापुढील असावी.
२. मागील वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/ स्टायपेंड लाभार्थी नसावा.
४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख पर्यंत असावे.

५. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल (जर दुसरे व तिसरे आपत्य जुळे असतील तर सदर योजनेचा लाभ घेता येईल.)

**ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती:-**

१. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनूसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणसाठी www.scholarshps.gov.in या संकेतस्थळावर आधार क्रमांक नमुद करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.३१.१०.२०२५ ही आहे.

३. विद्यार्थ्यांना आधार आयडी (UDID) असने व तसेच लाभार्थ्यांच्या नावे असलेल्या चालू स्थितीत (Operative/Active Mode) बँक खात्याशी सलग्न असणे आवश्यक आहे जेणेकरुन शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरण केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम जमा करणे सुलभ होईल.

४. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याकरिता दिव्यांगजन असल्याचे ओळखपत्र (UDID) असणे आवश्यक आहे.

५. अर्जदारांनी अर्ज प्राप्त करण्यासाठी विहित केलेल्या शेवटच्या तारखेच्या आत ऑनलाईन प्रणालीद्वारे त्यांचे अर्ज सादर करावेत. सर्व आवश्यक कागदपत्रे जसे की फोटो, वयाचा पुरावा, अपंगत्व प्रमाणपत्र, पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र, शिक्षण शुल्काची पावती अंतिम शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र इ. विहित नमुन्यात रीतसर भरलेले ऑनलाईन पध्दतीने अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच वरील सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावेत.

६. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय/संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज पुर्ण करुण घ्यावा. तसेच उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनालाईन अर्ज भरावा.

७. जर उमेदवार एका राज्याचा कायमचा रहिवासी असेल परंतू दुस-या राज्यात शिकत असेल तर, सदर विद्यार्थ्याच्या अर्जाची शिफारस त्या राज्याच्या शिक्षण/कल्याण विभागाने केली पाहिजे ज्याचा तो कायम रहिवासी आहे.

८. एखाद्या विद्यार्थ्याने खोटया कागदपत्राद्वारे शिष्यवृत्ती मिळवल्याचे आढळल्यास, त्याची/तिची शिष्यवृत्ती त्वरित रद्य केली जाईल आणि दिलेली शिष्यवृत्तीची रक्कम अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरण विभाग, सरकारच्या निर्णयानूसार वसूल केली जाईल. तसेच संबंधित विद्यार्थ्याला काळया यादीत टाकले जाईल आणि कोणत्याही योजनेतील शिष्यवृत्तीपासून कायमचे वंचित केले जाईल.

९. विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती ज्या अभ्यासक्रमासाठी प्रदान करण्यात आली होती त्या अभ्यासाच्या विषयामध्ये विद्यार्थ्याने बदल केल्यास दिलेली संबंधित विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद करण्यात येईल.

१०. सदर शिष्यवृत्तीची रक्कम भारत सरकारच्या दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग व्यक्तींच्या सक्षमीकरण विभागाच्या मार्फत देण्यात येते, परंतू ज्या अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती प्रदान देण्यात आलेली आहे तो

संबंधित अभ्यासक्रम बंद केल्यास सदरहू विद्यार्थी शिष्यवृत्तीची रक्कम परत करण्यास जबाबदार आहे. तसेच विद्यार्थ्यांला देण्यात आलेला देखभाल भत्ता १ एप्रिलपासून किंवा प्रवेशाच्या महिन्यापासून, यापैकी जे नंतर असेल, परीक्षा पूर्ण झालेल्या महिन्यापर्यंत, शैक्षणिक वर्षाच्या शेवटी देय असेल, परंतू जर विद्यार्थी महिन्याच्या २० तारखे नंतर प्रवेश घेतला असेल तर प्रवेशाच्या महिन्याच्या पुढील महिन्यापासून रक्कम देण्यात येईल.

११. मागील वर्षांमध्ये देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणाच्या बाबतीत, अभ्यासाचा कोर्स सतत चालू असल्यास, मागील वर्षात ज्या महिन्यापर्यंत शिष्यवृत्ती दिली गेली होती त्या महिन्यापासून देखभाल भत्ता देण्यात येईल.

१२. विद्यार्थी जर एकाच वेळी दोन अभ्यासक्रमामध्ये शिकत असेल तर कोणताही एकाच अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल.

१३. दुरस्त शिक्षण (Distance Education) घेणारे विद्यार्थी देखील सदर शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यास पात्र असतील.

१४.तसेच शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज भरणे करिता एक वेळ नोंदणी क्रमांक (OTR) व फेस-ऑथेंटिकेशन करणे आवश्यक असल्याने त्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदरहू ओटीआर क्रमांकाद्वारे विद्यार्थ्यांनी नविन मंजूरीचे (Fresh) आणि नूतनीकरणाचे (Renewal) शिष्यवृत्ती अर्ज भरावेत.

**शिष्यवृत्ती वितरणाची पध्दत** :-

१. शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड झालेल्या नवीन मंजुरीचे व नूतनीकरण्याचे विद्यार्थ्यांना DBT मोडद्वारे आधारशी लिंक केलेल्या त्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम थेट जमा केली जाईल.

२. नवीन मंजुरीच्या विद्यार्थ्यांसाठी योजनेचा लाभ संपुर्ण देशात देण्यात येत असल्याने राज्य सरकारच्या संबंधित विभाग/नोडल अधिका-याने केलेल्या ऑनलाईन पडताळणीच्या आधारे आणि अपंग व्यक्तींच्या राज्यनिहाय लोकसंख्येची टक्केवारी लक्षात घेऊन, राज्यवार प्राप्त झालेल्या नवनी मंजूरीच्या अर्जांची संख्या पैकी पात्र अर्जांच्या एकुण संख्येच्या संबंधात टक्केवारीच्या अटींमध्ये रुपांतरित केली जाईल आणि त्यानंतर अपंग व्यक्तींच्या राज्य निहाय लोकसंख्येची सरासरी टक्केवारी आणि पात्र अर्जांची राज्यनिहाय टक्केवारीवर आधारित राज्यनिहाय शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांची संख्या निश्चित केला जाईल. तसेच लाभार्थ्यांच्या निवडीसाठी योग्यता निकष अपंगत्व प्रमाणपत्रात दर्शविल्यानुसार अपंगत्वाची ४० टक्केवारी असलेला विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असेल व समान दिव्यांगत्व टक्केवारी असेल तर ज्या विद्यार्थ्याचे वय जास्त आहे त्या विद्यार्थ्यास निवड यादी मध्ये प्राधान्य देण्यात येईल.

३. नूतनीकरण्याच्या विद्यार्थ्यासाठी जे विद्यार्थी अर्जांची अंतिम पडताळणी केंद्रशासनामार्फत केल्यानंतर पात्र ठरलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येईल.

**शिष्यवृत्तीची कालावधी आणि नूतनीकरण :**

१. एकदा दिलेल्या शिष्यवृत्तीचा लाभ तो अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी ज्या टप्यावर दिली जाईल त्या टप्यापासून प्रभावी होईल आणि उपस्थितीत नियमितता असेल तरच पुढील शिक्षण होईपर्यंत त्याचे नूतनीकरण करण्यात येईल, परंतू एकाच वर्गात दुस-यांदा बसल्यास दुस-या वर्षी विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.

२. जर एखादा विद्यार्थी आजारपणामुळे किंवा इतर कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे वार्षिक परीक्षेत बसू शकला नाही तर, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि/किंवा इतर आवश्यक पुरावे सादर केल्यावर पुढील शैक्षणिक वर्षासाठी सदरहू विद्यार्थी नुतनीकरणाचा अर्ज भरण्यास पात्र असेल.

३. एखाद्या विद्यार्थी ATKT घेऊण पुढील वर्गात प्रवेश मिळला असेल तर सदरहू विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असेल.

**विद्यापिठ/महाविद्यालय/संस्थेसाठी सूचना :-**

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपद्धती पार पाडावी तसेच मंजुर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक योजना सन २०२५-२६ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव/ प्राचार्य/ संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operation procedure) या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

उपरोक्त सूचना XI,XII, Post-Matriculation Diploma/Certificates, Bachelor's Degree or Diploma in India, Master's Degree/Diploma from any University recognized by UGC/AICTE येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना/विद्यापीठांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी संचालनालयास सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 14-07-2025 10:49:37

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रत-

१.मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२.मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, ३ चर्चपथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

प्रत-

१. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग, मुंबई

२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई

३. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग, मुंबई.

४. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे.

५. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी, दिंडोरी रोड नाशिक - ४२२००४

६. कुलसचिव महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ, फुटाला लेक, नागपूर ४४० ००१

७. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.
यांनी त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता ११ वी व १२ वी ) सूचना देण्यात याव्यात.

८.कुलसचिव, सर्व कृषी/अकृषी/अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

**File.No. Z-11017/18/2022-SCH**
भारतसरकार /Government of India
**दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग**
Department of Empowerment of Persons with Disabilities (Divyangjan)
सामाजिक न्याय और अधिकारिता मंत्रालय/ Ministry of Social Justice & Empowerment
पाँचवा तल, बी विंग, पंडित दीनदयाल अंत्योदय भवन , सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नईदिल्ली -110003
5th Floor, B Wing, Pt. Deendayal Antyodaya Bhawan, CGO Complex, New Delhi-110003

**Dated: 04.07.2025**

To,
All State Nodal Officers (SNOs)

**Subject: Revision of the scheme guidelines and opening of National Scholarship Portal for application submission process flow in respect of Scholarship Scheme for Student with Disabilities from AY 2025-26.**

Sir/Madam,

The Department is implementing Pre-Matric, Post-Matric and Top Class Education Scheme for Scholarships for Students with Disabilities through National Scholarship Portal(NSP) for the AY 2025-26.

**2.** In this regard, it may be mentioned that some modification in the scheme has been carried out as attached in **Annexure- 1** which are already modified on NSP of DEPwD under Pre Matric, Post Matric and Top Class Education scheme for the year 2025-26 and the National Scholarship Portal is opened for application submission process in respect of all three schemes of the Department. The details are as under:

| S.No | Name of the Scheme | Opening of the Portal | Student Login Till | Defective Application Verification Open till | Inst. Verification open Till | DNO/SNO/MNO verification open Till |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Pre-Matric | 25.06.2025 | 31.08.2025 | 15.08.2025 | 15.09.2025 | 30.09.2025 |
| 2 | Post Matric | 25.06.2025 | 31.10.2025 | 15.11.2025 | 15.11.2025 | 30.11.2025 |
| 3 | Top Class Education | 25.06.2025 | 31.10.2025 | 15.11.2025 | 15.11.2025 | 30.11.2025 |

**3.** Further, it is to mention that the verification of application level has also been modified on NSP. Now, the verification of the applications will be done as per the following manners:

| S.No | Scheme Name | Fresh/Renewal | INO | SNO | MNO | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Pre-Matric | Fresh | Yes | Yes | Yes | No Change |
| | | Renewal | Yes | No | Yes | In case of renewal application, verification from State Nodal Officer is not required as the verification was already done in case of Fresh application of the same applicant. |
| 2 | Post Matric | Fresh | Yes | Yes | Yes | No Change |
| | | Renewal | Yes | No | Yes | In case of renewal application, verification from State Nodal Officer is not required as the verification was already done in case of Fresh application of the same applicant. |
| 3 | Top Class Education | Fresh | Yes | No | Yes | First application is being filled up by applicant and verified by INO/HOI (L1). The verified application may be directly forwarded to Ministry. SNO (L2) shall be removed. |
| | | Renewal | Yes | No | Yes | |

4. Therefore, all SNOs are requested to immediately inform the concerned INOs to inform the eligible Students with Disability (SwD) for submission of applications and complete verification process for the applications submitted by the students on the portal.

5. This issues with the approval of the competent authority.

Yours faithfully,

Encl: As above

Sandeep Kumar
Digitally signed by Sandeep Kumar
Date: 2025.07.04 17:30:05 +05'30'

(Sandeep Kumar)
Under Secretary to the Government of India

Copy to :

1. Principle Secretary of the States/UTs
2. PPS to Additional Secretary, Scholarship, DEPwD
3. PA to Director, Scholarship, DEPwD